संक्षिप्त



कोल्हापूर : सृष्टी कुलकर्णीची ऑल इंडिया बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल सत्कार करताना मान्यवर.

# सृष्टीची ऑल इंडिया बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड

**कोल्हापूर :** जयपूर येथे झालेल्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ महिला बुद्धिबळ स्पर्धेमध्ये विवेकानंद महाविद्यालयाची विद्यार्थिनी सृष्टी कुलकर्णीने रौप्यपदक मिळवले. तिची मेरठ येथे होणाऱ्या ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी बुद्धिबळ महिला स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या संघामध्ये निवड झाली आहे. तिला स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, सी.ई.ओ. कौस्तुभ गावडे यांचे प्रोत्साहन लाभले. प्रभारी प्राचार्य डॉ. सी. बी. पाटील, आय. क्यू. ए. सी. समन्वयक डॉ. श्रुती जोशी, जिमखाना विभागप्रमुख डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले यांचे मार्गदर्शन लाभले.

पुढारी

कोल्हापूर, गुरुवार, १२ मार्च २०२६

# मुक्त विद्यापीठाच्या वतीने उद्या रोजगार मेळावा

**कोल्हापूर :** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ विभागीय केंद्र कोल्हापूर, विवेकानंद महाविद्यालय आणि युवाशक्ती फाऊंडेशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार, दि. १३ मार्च रोजी विवेकानंद महाविद्यालयात रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. संयुक्त उपक्रमांद्वारे हजारो विद्यार्थ्यांना रोजगारक्षम कौशल्ये, उद्योग अनुभव व करिअरच्या संधी उपलब्ध होणार आहेत. पात्र विद्यार्थ्यांना ३० हजार रुपयांपर्यंतचे विद्यावेतन प्रशिक्षणा दरम्यान मिळणार आहे. प्रशिक्षण काळात निवास, भोजन व वाहतुकीसंबंधी माहितीबाबत मार्गदर्शन करण्यात येईल. रोजगार मेळाव्यासाठी उपस्थित विद्यार्थ्यांकडून कुठल्याही प्रकारचे शुल्क आकारण्यात येणार नाही. १८ ते ३५ वर्षे वयोगटातील बेरोजगार युवकांनी रोजगार मेळाव्यात सहभागी होण्यासाठी https://forms.gle/U77MWgbTPnuwdHbx9 या लिंकवर नावनोंदणी करावी. रोजगार मेळाव्यात निवड झालेल्या विद्यार्थ्यांना त्याचदिवशी नियुक्तीपत्र देण्यात येणार आहे. अशी माहिती वरिष्ठ शैक्षणिक सल्लागार प्रा. डॉ. आर. व्ही. कुलकर्णी यांनी दिली.

12/3/26

12/3/26